**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा ‘अ’ मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

## विद्यापीठाच्यावतीने हिततुल्य घटकांच्या सभेचे आयोजन १ मे ला
## सर्व स्टेकहोल्डर्स, ॲकेडेमिशियन्स, एन्टरप्रिनर्स, रिसर्चर्स, ॲल्युमिनी यांची उपस्थिती

अमरावती.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाला १ मे, २०१८ रोजी पत्तीस वर्षे पूर्ण होत आहेत. विद्यापीठाच्या जळणघडणीत विद्यापीठाशी संलग्नित स्टेकहोल्डर्स, ॲकेडेमिशियन्स, एन्टरप्रिनर्स, रिसर्चर्स, ॲल्युमिनी यांचे बहुमूल्य योगदान राहिलेले आहे. त्यांच्या सूचना सुद्धा विद्यापीठासाठी महत्वाच्या ठरल्या आहेत. त्यादृष्टीने कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर यांनी १ मे महाराष्ट्र स्थापना दिन, विद्यापीठ स्थापना दिन आणि आंतरराष्ट्रीय कामगार दिनाचे औचित्य साधून विद्यापीठातील डॉ.के.जी. देशमुख सभागृहात सर्व हिततुल्य घटकांच्या ‘ॲन एनव्हीजन्ड जर्नी’ उपक्रमाचे आयोजन १ मे, २०१८ रोजी दुपारी ४.०० वाजता केले आहे.

१ मे, १९८३ रोजी अमरावती विद्यापीठाची स्थापना पश्चिम विदर्भातील अमरावती विभागस्तरावर झाली. गेल्या पत्तीस वर्षांमध्ये विद्यापीठाने या भागातील विद्यार्थ्यांच्या हितासाठी उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध करुन दिल्यात. याशिवाय विद्यार्थीहितार्थ अनेक उपक्रम राबविले आहेत, त्या सर्वांचा गौरव व्हावा, अशी कुलगुरुंची इच्छा आहे. त्यादृष्टीने ‘ॲन एनव्हीजन्ड जर्नी’ हा उपक्रम राबवित आहे. या कार्यक्रमाला सर्व स्टेकहोल्डर्स, ॲकेडेमिशियन्स, एन्टरप्रिनर्स, रिसर्चर्स, ॲल्युमिनी याशिवाय विद्यापीठातील शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, अधिकारी, शिक्षक तसेच महाविद्यालयांतील प्राचार्य, शिक्षक यांची सुद्धा उपस्थिती राहणार आहे. ‘ॲन एनव्हीजन्ड जर्नी’ कार्यक्रमासाठी स्टेअरींग कमिटीचे गठण करण्यात आले आहे. तरी सर्व संबंधितांनी या कार्यक्रमाला उपस्थित रहावे, असे आवाहन विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. अजय देशमुख यांनी केले आहे.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. २४/०४/२०१८.
दै.............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी